## Part II: Specific Immediate Action Plan (2016-17)

### General guiding principles:

As per the provisions of Section 36(2), 56(3), 81(1) and 82(2) of the Maharashtra Universities Act, 1994 for planning and implementation of higher education the Perspective Plan is prepared. Accordingly, for implementation of Higher Education policy the State Higher Education Council vide G.R. dated 20th July, 2015 constituted Committee under the Convernership of Dr. Narendra Jadhav, Renowned Economist & Educationist to prepare general guidelines for preparing Perspective Plan by the Non-agricultural Universities in Maharashtra. The general guidelines prepared by the said Committee have been accepted by the State Higher Education Council at its meeting held on 14th October, 2015. Accordingly, as per the letter No.Ushipa/PraKra 626/Vishi-3, dated 17th October, 2015 and No.UNI/Ushipa/2015/NaVI/Vishi-1 dated 17th October, 2015 of Director, Higher Education, Pune, the Board of College & University Development has constituted Committee to prepare the draft Perspective Plan of the University for the academic year 2016-17 as per the guidelines suggested by Dr. Narendra Jadhav Committee. Thereafter, the draft Perspective plan prepared by the Committee was placed before the Board of College & University Development and before the Academic Council and the Senate through the Management Council and accordingly the same has been finalised incorporating the suggestions made by the Hon'ble members of the respective authorities.

The general guiding principle will be informed by the fact that there will be no general expansion allowed and that emphasis will be on consolidation of extant system so that it delivers better outcomes. Having said this there will be no general ban on any proposal which specifically argues for making up of deficiencies, regional backwardness, natural growth, need for a particular faculty, empowerment of women etc. Apart from the legal requirements arising out of the relevant GRs issued from time to time, as well as specific court orders the consideration will be organized along the three tracks of colleges/ courses, spatial situation and faculties. Thus whatever may be said in the general guidelines or principles should there be a perceived and actual lag in particular courses in specific faculties these would be sought to be remedied either by requesting for applications for new colleges or new courses. Also,

educationally backward regions will also be considered for new expansions (apart from natural growth) for holistic education. Further any applications for evening/ night colleges and those colleges specifically meant for women will be encouraged.

- **Specific Guidelines**

The Committee decided that the following guidelines shall ordinarily be followed for under-graduate and post-graduate New Colleges / New Programmes / Courses / Additional Divisions while considering the proposals

1. Total Number of Divisions per college would be restricted to 4 in Municipal Corporation and Municipal Council areas and 2 in other than Municipal Corporation and Municipal Council areas. Also in case of colleges under Faculty of Technology number of Divisions restricted to 2 per branch (including Second Shift).

2. Additional divisions would be allowed only in colleges if occupancy of the existing divisions over past 3 years has been above 80%.

3. Existing colleges intended to take innovative programs / courses started by the University from the academic year 2014-15 would be encouraged.

4. The University has to follow strict guidelines viz. availability of infrastructure facilities, approved Principal/faculty members, participation in assessment, evaluation and other infrastructure along with proximity to other colleges as a pre-condition for affiliation as laid down by the concerned Government authorities.

5. In order to maintain high academic quality, the proposals will be considered for starting new course/additional division/subject to the colleges who have acquired NBA/NAAC accreditation/re-accreditation on or before 31st December, 2015 also the interest of concerned Trust/Scoiety/Sanstha towards providing higher education etc. will be considered.

6. The University will also consider following broad aspects while considering the proposals:

   (i) Geographical location in terms of districts/ taluka
   (ii) Faculties/ courses available in that district/ taluka/ area
   (iii) Colleges offering innovative courses will be encouraged
   (iv) Proximity to other similar colleges in the area
   (v) Experience of concerned Trust/Society/Sanstha in Higher Education.

| Sr.No. | Classification | Distance between two colleges |
|---|---|---|
| A. | Metropolitan City (with more than 15 lakh population) | 2 Kms. |
| B. | Municipal Corporation (with population between 5 to 15 lakhs) | 3 Kms. |
| C. | District Level | 4 Kms. |
| D. | Other Cities (with population between 2 to 5 lakhs) | 5 Kms. |
| E. | Rural area | 20 Kms. |
| F. | Hilly and Backward Region with Low GER region | 10 Kms. |

7. As regarding assurance given by the Hon'ble Minister of Higher & Technical Education, it is proposed to establish Government Engineering Colleges at Palghar, Thane, Raigad, Ratnagiri and Sindhdurg Districts at district level subject to availability of land and financial support by the respective State as well as Central Government, accordingly.

8. Considering the guidelines regarding Women empowerment provision for establishment of new Women Colleges has been made in the Perspective Plan.

9. It is proposed to start courses like Cultivation of Bamboo and Canned Industry, Oceanography, Marine Biology through Sindhu Swadhyay Institute has been made in the Plan. Also, courses like Fire & Safety Management will be proposed to start in the industrial belt of Navi Mumbai and Raigad districts of the University. This course will be proposed as associate degree courses under which students will get Diploma Certificate on completion of one year, Advanced Diploma Certificate on completion of two year and Degree Certificate after completion of three years course. Also various job oriented skilled based programmes will be started as per the need of the Industries and in consultation with the Zilha Udyog Kendra.

10. It is proposed to start various Diploma/Degree courses in Music and Dance through the affiliated colleges/ institutes and Institute of Distance & Open Learning (IDOL). Also Certificate course, degree and M.B.A. in Sports Management will be started through Institute of Distance and Open Learning (IDOL) at the earliest.

11. The Colleges/Institutions through which at least two batches of students complete their degrees only those colleges/Institutions proposal will be accepted for start of Post-graduate degree courses.

12. Affiliated autonomous colleges, Colleges with Potential for Excellence and also accredited with A grade by the NAAC/NBA, which intended to start their new courses /Satellite Centres in Rural areas will be encouraged.

- **Recommendations for starting new colleges / courses / divisions / subjects:**

Based on the various aspects mentioned above and considering the guidelines submitted by the Committee appointed by State Higher Education Council consisting of Dr. Narendra Jadhav (Convener), the Committee recommends the following provisions in the Perspective Plan for the academic year 2016-17:

[A] Proposals for the new colleges (Law / Palghar District) / new courses/additional divisions/subjects which were applied by the respective Trusts/Societies/Colleges for the academic year 2015-16 and which were forwarded by the University to the Government of Maharashtra will be considered for the academic year 206-17 as per the Perspective Plan, subject to condition that they will have to apply again in prescribed format before 31st December, 2015 alongwith all the necessary documents. Further, if they had not reimbursed the fees paid earlier, not require submitting fees again. Also, on their proposal the necessary action as per the provisions of the Maharashtra Universities Act, 1994 and respective Government Resolutions will be taken, which may be noted.

[B] Considering the existing Gross enrolment Ratio in the Districts under the jurisdiction of the University of Mumbai and to increase the same by 5% the following provisions are made:

1. New Colleges, one each in the Districts of Thane Rural area, Palghar, Raigad, Ratnagiri and Sindhudurg, where college is not available within 20 Kms. of radius.
2. Considering the requirement of skilled manpower in various fields, it is proposed to start various Certificate, Diploma and degree courses through the affiliated colleges
3. Colleges intended to take innovative/regular courses offered by the University from the academic year 2016-17 would be encouraged (List attached).
4. Provisions for new Colleges for Women and Night have been made in the Plan as per attached Annexure.
5. Considering the intake capacity and vacant seats and enrolment and geographical location provision for starting New programmes / additional divisions / subjects has been made for the colleges across the jurisdiction of the University of Mumbai.
6. Courses like N.S.S., N.C.C., Physical Education and Extension Activities - Optional for Foundation course in B.A., B.Com, B.Sc. will encouraged for granting affiliation.
7. Starting of 4 years integrated programme leading to (1) B.A. – B.Ed./ B.Sc.- B.Ed. degree in the existing affiliated B.Ed. colleges as per the guidelines of N.C.T.E. and guidelines mentioned above across the jurisdiction of University of Mumbai.

8. To increase the academic excellence and to make available high class educational facilities, affiliated colleges who have accredited by NAAC/NBA, proposals will be invited from them for 'Smart Colleges' accordingly.
9. Additional divisions for LL.B. (3 years & 5 years) degree courses will be allowed in existing law colleges where only one division is available.
10. LL.M. in the affiliated Law colleges as per the criteria mentioned above in Mumbai, Thane and at other District level.
11. In Engineering Colleges divisions restricted to 2 per branch (including Second Shift).

*******

# मुंबई विद्यापीठ- बृहत आराखडा २०१६-१७ निकषाबाबत पूर्तता अहवाल

१. सकल सहभाग गुणोत्तर (Gross Enrolment Ratio) वृध्दी:

Gross Enrolment Ration 5% टक्क्यांनी वाढावा याकरिता विद्यापीठ परिक्षेत्रात नविन अभ्यासक्रम/तुकडया तसेच रायगड, रत्नागिरी व सिंधूदूर्ग जिल्हयांमध्ये नविन महाविद्यालये प्रस्तावित बृहत आराखडयाच्या शिफारशीत करण्यात आलेले आहेत.(पान क्र.३८)

२. महिला सक्षमीकरण:

शिक्षणापासून वंचीत मुलींना महाविद्यालयीन शिक्षण प्रवाहात आणण्याचे विशेष उद्दिष्ट लक्षात घेता मुंबई शहरात एक महिला विधी महाविद्यालय तसेच विद्यापीठ परिक्षेत्रामध्ये जिल्हयात एक महिला महाविद्यालये सुरू करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. (सद्यस्थितीत विद्यापीठाशी एकूण २४ महिला संलग्नित महाविद्यालये आहेत)(मुंबई-१०, नवी मुंबई-१, पालघर-२, ठाणे-७, रायगड-३ आणि सिंधूदूर्ग-१).(पान क. ३८)

३. प्रवेश क्षमता:

विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांचा नांव नोंदणीचा तपशिल पहाता महाविद्यालयांकरिता नविन अभ्यासक्रम/तुकडीवाढ याबाबत भौगोलिक स्थिती व गरजेनुसार उपलब्ध करून देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

४. दोन महाविद्यालयातील अंतर:

दोन महाविद्यालयातील अंतराचा निकष मार्गदर्शक म्हणून समाविष्ट केला असून मुंबई शहर तसेच उपनगरात एकाच विभागातील महाविद्यालयांचे प्रस्ताव भिन्न अभ्यासक्रमांकरिता विचारात घेतले जातील परंतू ग्रामिण भागामध्ये कौशल्याधारीत व व्यवसायिक अभ्यासक्रमांकरिता सादर केलेल्या प्रस्तावांना महाविद्यालयांतील अंतराची अट लागू राहणार नाही. सविस्तर निकष देण्यात आले आहेत.(पान क्र. ४१) ।

५. विद्यापीठ परिक्षेत्रातील कृषी, औद्योगिक, व्यावसायिक वैशिष्टये:

मुंबई विद्यापीठाचा परिसर हा पालघर ते रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयांच्या सागरी किना-याचा समावेश होत असून शैक्षणिक मागास व डोंगराळ परिसर यांचा मुख्यत्वे समावेश आहे व या भागात शेती व फलोत्पादन हा व्यवसाय मुख्य असून नवी मुंबई, रायगड या परिसराचा औद्योगिक विकास, सिडको व एम.आय.डी.सी. च्या माध्यमातून होत असून या बाबींचा विचार करता शेती व फलोत्पादन बाबत अभ्यासक्रमाची या क्षेत्राकरिता तरतुद केली आहे. काही अभ्यासक्रम कृषी उत्पादनाशी निगडीत असून "Cultivation of bamboo and Canned Industry, Ocenography through Sindhu Swadhyay Institute, Fisheries, Marine Biology, Acqua Culture etc." यांचा समावेश आहे. तसेच रोजगाराच्या विविध संधी बघता Fire and Safety Management ही काळाची गरज असून विद्यापीठाचा सदर अभ्यासक्रम पदविपूर्व स्तरावर राबविण्याचा विचार आहे. राष्ट्रीय कौशल्य विकास मंडळाचा विचार करता पदविपुर्व स्तरावर, प्रमाणपत्र, पदविका व पदवी स्तरावर नावाजलेल्या औद्योगिक संस्थांच्या निकडीनुसार जिल्हा उद्योग केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने अभ्यासक्रम आयोजित करण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशिल राहील. यातून स्वयंरोजगाराच्या संधी मोठया प्रमाणात उपलब्ध होतील .

६. सद्यस्थितीतील प्रवेश क्षमता व रिक्त जागा:

विद्यापीठाने प्रवेश क्षमता व रिक्त जागांचा अभ्यास केला असून, ज्या जिल्हयांमध्ये प्रवेशासाठी विद्यार्थ्यांकडून जास्त मागणी आहे, अश्या पदव्युत्तर एम.एस्सी. (रसायन शास्त्र), एल.एल.बी अभ्यासक्रम यासाठी प्रवेशक्षमता वाढवून देण्याचे नियोजन केले आहे. तसेच सरासरी २५% पेक्षा जास्त जागा ज्या अभ्यासक्रमांच्या रिक्त आहेत त्या अभ्यासक्रमांसाठी नविन महाविद्यालये/तुकडया मंजूर केल्या जाणार नाहीत याची खबरदारी घेतील जाईल.

७. भौगोलिक स्थान व ख्यातकीर्त संस्थांची वैशिष्ठये:

विद्यार्थ्यांचा मुंबई तसेच जिल्हयाच्या ठिकाणच्या महाविद्यालयांकडे येण्याचा ओढा जास्त असला तरी इतर ठिकाणची महाविद्यालये व त्यामध्ये देण्यात येणारे अभ्यासक्रम यांचा दर्जा व गुणवत्ता वाढवण्याच्या दृष्टीने विद्यापीठ प्रयत्न करित असून अशी गुणवत्ता वाढविण्याने सदरचे विद्यार्थी बाहेर जाण्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल यासाठी विद्यापीठाने सर्व महाविद्यालयांची नॅक /एनबीए यांचेकडून मुल्यांकन करून मानांकन मिळविण्यासाठी सक्तीचे केलेले आहे. महाविद्यालयांचे नॅक /एनबीए मुल्यांकन असल्याशिवाय नविन अभ्यासक्रम/तुकडया/विषय दिले जाणार नाहीत याची तरतुद केलेली आहे. तसेच विद्यापीठातील १९२ महाविद्यालयांनी नॅक मुल्यांकन केलेले आहे आणि बरीचशी महाविद्यालये श्रेष्ठत्व क्षमता महाविद्यालये (Potential with Excellance) पात्र ठरलेली आहे. काही महाविद्यालयांमध्ये स्मार्ट कॉलेज ही संकल्पना राबवून महाविद्यालयांची गुणवत्ता वाढविण्यास प्रयत्न करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

८. दर्जात्मक शिक्षणाच्या प्रसरणाची सामाजिक जबाबदारी:

ज्या महाविद्यालयात उपलब्ध असलेली भौतीक पायाभूत सुविधा, अभ्यासक्रम, तज्ञ विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राध्यापक उपलब्ध आहेत या सर्व गोष्टींचा उपयोग विद्यापीठ परिक्षेत्रातील ग्रामीण/ आदिवासी डोंगरीभागातील महाविद्यालयांतर्गत जोडून घेऊन हया सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत प्रयत्न करण्यात येईल तसेच विद्यापीठाच्या अभासी (Virtual Class Room) शिक्षण केंद्रामार्फत महाविद्यालये व उपकेंद्र यांना जोडून अभ्यासक्रम / व्याख्याने उपलब्ध करून देण्याचा विचार बृहत आराखडयात करण्यात आला आहे.

९. अभ्याक्रमातील विविधता:

पारंपारिक कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखांपुरता विचार न करता कौशल्याधारित अभ्यासक्रम/ किडा विषयक अभ्यासक्रम/ आंतर शाखीय अभ्यासक्रम या सर्वांचा समावेश बृहत आराखडयात करण्यात आला असून ललीत कला व कला यांचे अभ्यासक्रम जे आज मुंबई शहरापुरते मर्यादित आहे ते पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधूदूर्ग या जिल्हयांमध्येही तसेच संगित चित्रपट यासंबंधीचे अभ्यासक्रम दुर व मुक्त अध्ययन शिक्षण संस्थेमार्फत उपलब्ध करून देण्याची तरतुद करण्यात आली आहे. तसेच Certificate Course in Biology and Aesthetics and M.B.A. in Sports Management याची तरतूद करण्यात आली आहे.

१०. शैक्षणिक गुणवत्ता मूल्यमापन:

NAAC/NBA असल्याशिवाय वाढीव तुकडया व अभ्यासक्रमांना मान्यता मिळणार नाही याचा समावेश बृहत आराखडयात केला आहे. तसेच पदवी स्तरावरिल किमान २ बॅचेस पूर्ण झाल्याशिवाय पदव्युत्तर अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात येणार नाही अशी तरतूद करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त विद्यापीठाने महाविद्यालयांचा Academic Audit कार्यक्रम आखला असून पहिल्या फेरीमध्ये ३१ महाविद्यालयांचे Academic Audit चे काम सुरू आहे. त्यामुळे सर्वच महाविद्यालयांमध्ये साधारण समान गुणवत्ता झाल्याने शहरी व ग्रामिण भागातही समान दर्जाचे शिक्षण उपलब्ध होईल.

११. औद्योगिक शहरातील सायंकालीन महाविद्यालये:

सद्य:स्थितीत मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सायंकालीन (रात्र) महाविद्यालयांची संख्या २२ आहे. (मुंबई-१५, ठाणे-५ आणि नवी मुंबई-३) त्याचप्रमाणे पालघर, रायगड व विद्यापीठ परिसरामध्ये रात्र महाविद्यालयांबाबत बृहत आराखडयात तरतूद करण्यात आली आहे.(पान क्र.३८)

१२. स्वायत्ततेचा आग्रह:

विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांपैकी एकूण १९२ महाविद्यालयांनी नॅक / एनबीए कडून मुल्यांकन करून घेतलेले असून त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी महाविद्यालयांसाठी कार्यशाळा आयोजित करण्याबाबत विद्यापीठ स्तरावर तरतूद केलेली आहे. तसेच नॅक मुल्यांकीत व कायम संलग्नता प्राप्त महाविद्यालयांना स्वायत्ततेकरिता मार्गदर्शन करण्यात येत असून त्याबाबत त्यांना उदयुक्त करण्यात येत आहे.

१३. विधी महाविद्यालयांसाठी विशेष शिफारस:

मागिल दोन वर्षांचा नांवनोंदणीबाबतच्या तपशिलाचे अवलोकन करून महाविद्यालयांकडे प्रवेंशाकरिता सादर केलेले अर्ज व उपलब्ध जागा यांचा विचार करता बृहत आराखडयात नविन विधी महाविद्यालय सुरू करण्याबाबत तरतुद केलेली आहे व सदर महाविद्यालये न्यायालय असलेल्या ठिकाणीच सुरू होतील अशा ठिकाणी त्यांची स्थळे निश्चित करण्याबाबत तरतूद केली आहे.

१४. प्रमाणपत्र, पदविका, प्रगत पदविका, बी.व्होक.अभ्यासक्रम:

भारत सरकारच्या व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार कौशल्य विकासाधिष्ठीत प्रमाणपत्र, पदविका व प्रगत पदविका अभ्यासक्रम सुरू करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने B.A. (Interior Design), B.A. (Fire & Safety) अश्या प्रकारचे अभ्यासक्रमांची उपलब्धता करण्यात आली असून एक वर्ष पूर्ण केल्यास प्रमाणपत्र, दोन वर्ष पूर्ण केल्यास पदविका व तीन वर्ष पूर्ण केल्यावर पदवी प्रदान करण्याबाबतचे अभ्यासक्रम सुरू करण्याचे प्रस्तावित आहे.

१५. भविष्यकालीन कुशल मनुष्यबळाची गरज:

२०२२ पर्यंत देशास मोठया प्रमाणात कुशल मनुष्यबळाची गरज लागणार आहे हे गृहीत धरून प्रमाणपत्र पदवीका यांचे माध्यमात व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमाची तरतूद करण्यात आली आहे असून सागरी अभ्यासक्रम, संरक्षण उपाययोजना, तांत्रिक कुशल मनुष्यबळ तयार करण्याच्या दृष्टीने अभ्यासक्रमाच्या संधी महाविद्यालयांना उपलब्ध करून देण्यात येतील.

१६. संशोधन विकास आराखडा:

संशोधनाची क्षेत्रे यांच्याबाबत अभ्यासक्रम विद्यापीठाच्या विविध विभागात व विद्यापीठाच्या उपकेंद्रातून संशोधनाची उद्दिष्टये निश्चित करण्यात येतील त्या अनुषंगाने सर्वंकष आराखडा गुणवत्ता व दर्जा वाढविण्यासाठी तयार करण्यात येईल व त्यामध्ये विद्यापीठ परिक्षेत्रातील उदयोगधंदे व संशोधन संस्था यांचा सहयोग घेण्यात येईल.

१७. विकास आराखडयाची सर्वंकषता व विद्यापीठांचे उत्तरदायीत्व:

विद्यापीठाचा बृहत विकास आराखडा निव्वळ नवीन प्रस्तावित महाविद्यालयांची स्थाने ठरविण्यापुरता मर्यादीत न राहता विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभागांचा संख्यात्मक व गुणात्मक विस्तार, विद्यापीठ परिक्षेत्रातील उच्च शिक्षणाचा दर्जात्मक विस्तार, विद्यापीठे व माहाविद्यालये यांच्या सामाजिक जबाबदारीचा आयाम या सारख्या घटकांचा शास्त्रीय पध्दतीने संख्यात्मक आलेख व पंचवार्षिक उद्‌दिष्टे निश्चित करणे अशा स्वरूपाचा असेल याबाबत विचार करण्यात आला आहे. पर्यायाने दरवर्षी ठरविलेली संख्यात्मक व गुणात्मक उद्‌दिष्टे किती प्रमाणात साध्य झाली आहेत याबाबतचा विश्लेषणात्मक स्वयंमूल्यामापन अहवाल विद्यापीठ प्रकाशित करेल.

विद्यापीठाच्या ठाणे उपकेंद्रामध्ये राष्टीय विधी महाविद्यालय सुरू झाले असून तेथे बी.ए, एल.एल. बी. हे पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहे. तसेच तेथे M.B.A. in Poverty Management यासारखे अभ्यासक्रम लवकरात लवकर तेथे सुरू करण्याचे विद्यापीठाचे उद्‌दिष्ट आहे तसेच विद्यापीठाचे कल्याण येथील उपकेंद्रातही तांत्रिक व्यवसायिक अभ्यासक्रम सुरू करण्याचे व रत्नागिरी उपकेंद्रात रेल इनोव्हेशन ॲन्ड टेक्नॉलॉजी सेंटर सुरू करण्याचे उद्‌दिष्ट आहे.

१८. विद्यापीठाची उपकेंद्रे:

विद्यापीठाच्या प्रशासकीय कामकाजात सु-सुत्रता आणण्याच्या उद्‌देशाने व विद्यापीठाचे अभ्यासक्रम सर्वदूर उपलब्ध होण्यासाठी विद्यापीठाच्या उपकेंद्रांचे सबलीकरण करण्यात येणार आहे. रत्नागिरी ठाणे येथे विद्यापीठाची उपकेंद्रे अस्तित्वात असून, कल्याण येथे नविन विद्यापीठ उपकेंद्र सुरू करण्याचे काम प्रगती पथावर आहे तसेच झाराप येथे नविन उपकेंद्र सुरू करण्यासंबंधी विचार चालू आहे.

१९. उद्योगक्षेत्राचा सहभाग:

कौशल्याधारित अभ्यासक्रम हे यशस्वी उद्योगसंस्था यांच्या आवश्यक असलेल्या गरजेनुसार त्यांच्याशी सहकार्य करून लवकरात लवकर करण्यात येतील. तसेच विद्यापीठाचे रोजगार व स्वयंरोजगार केंद्र व कौशल्य विकास केंद्र विद्यापीठाच्या उपकेंद्रास जिल्हास्तरावर स्थापन करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

२०. प्रशिक्षण:

शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या प्रशिक्षणाचा कृती कार्यक्रम आखून विद्यापीठ व महाविद्यालयीन पातळीवरील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना आवश्यक प्रशिक्षण देऊन कार्यकुशल बनविण्यात येईल.

२१. उद्योजकता विकास:

जिल्हास्तरावर मुंबई विद्यापीठाचे मुंबई येथे रोजगार व स्वयंरोजगार केंद्र असून प्रत्येक जिल्हास्तरावर रोजगार व उद्योजकता कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल तसेच पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधूदूर्ग या जिल्हयांतील ग्रामीण भागासाठी कृषी आणि फलोत्पादन केंद्रे प्रस्तावित करण्यात येतील.

# भाग : २ सर्व साधारण मार्गदर्शक तत्वे (२०१६-१७)(मराठी अनुवाद)

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ चे कलम ३६(२), ५६(३), ८२(१), व ८२(२) मध्ये विद्यापीठाच्या बृहत आराखडयासंदर्भात तरतुद आहे त्यानुसार उच्च शिक्षणाचे नियोजन आणि अंलबजावणी करण्यासाठी बृहत आराखडा तयार करण्यात येतो. त्याअनुषंगाने महाराष्ट्र राज्याच्या उच्च शिक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य उच्च शिक्षण समितीने दिनांक २० जुलै २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये डॉ. नरेंद्र जाधव, प्रसिध्द अर्थ तज्ञ व शिक्षण तज्ञ यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठातील बृहत आराखडा संदर्भात सर्वसाधारण निकष तयार करण्याकरिता समिती गठीत केली होती. सदर समितीने तयार केलेले निकष राज्य उच्च शिक्षण परिषदेच्या दिनांक १४ ऑक्टोबर २०१५ रोजी झालेल्या बैठकीत मान्य करण्यात आले. त्याअनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे क्रं.उशिप/प्र.क्रं.६२६/विशि-३ दिनांक १७ ऑक्टोबर २०१५ तसेच मा. संचालक, उ.शि., पुणे यांचे क्रं युएनआय/उशिप/२०१५/नावि/विशि-१ दिनांक १७ ऑक्टोबर २०१५ रोजीच्या पत्रांनुसार विद्यापीठाने २०१६-१७ या वर्षाकरिता डॉ. नरेंद्र जाधव यांच्या समितीने सुचविलेल्या मार्गदर्शक निकषांनुसार बृहत आराखडा तयार करण्याकरिता महाविद्यालये व विकास मंडळ यांनी समिती गठीत केली होती. तद्नंतर सदर समितीने तयार केलेला बृहत आराखडयाचा मसूदा अधिनियमांच्या तरतूदीनुसार विद्यापीठाच्या महाविद्यालये व विकास मंडळ यांच्या झालेल्या बैठकीत तयार करून व्यवस्थापन परिषदेमार्फत विद्यापरिषद आणि अधिसभा यांच्यापुढे ठेवण्यात आला व त्यानुसार विविध प्राधिकरणांच्या सन्माननिय सदस्यांनी केलेल्या सुचना लक्षात घेउन तयार करण्यात आला आहे.

सर्व साधारण मार्गदर्शक तत्वे असे सुचित करतील की, त्यामुळे सर्वसाधारण विस्तार अपेक्षित नसून, आहे त्या शिक्षण पध्दतीला जास्तीत जास्त भक्कम करण्यावर भर देणे अपेक्षित आहे असे जरी म्हटले असले तरी पायाभूत सुविधा मधील कमतरता, प्रादेशिक मागासलेपणा, नैसर्गिक वाढ, विशिष्ट विद्याशाखेची आवश्यकता, महिलांचे सबळीकरण इत्यादींची पूर्तता करणाऱ्या बाबींवर सरसकट बंधन नसणार आहे. वेळोवेळी घेण्यात आलेले संबंधित शासन निर्णयांमुळे तसेच विविध न्यायालयीन निर्णयामधून उद्भवलेल्या कायदेशीर बाबींचा महाविद्यालयीन अभ्यासक्रम, विद्याशाखा व परीस्थितीनुसार या त्रिस्तरीय रचनेत विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्वसाधारण मार्गदर्शक तत्वांमध्ये काहीही नमुद केले असले तरीही त्या विशिष्ट अभ्यासक्रमाची आवश्यकता यांचा विचार करुन नव्या महाविद्यालयांची किंवा अभ्यासक्रमांची गरज भागवण्यात येईल. समग्र शिक्षणाचा विचार करतांना शैक्षणिक वृध्दीसाठी शैक्षणिक दृष्टया अविकसीत क्षेत्रांचा विचार करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे खास महिलांसाठी व सायंकालीन / रात्र महाविद्यालये यांच्या प्रस्तावांना प्रोत्साहन देण्यात आलेले आहे.

## सूक्ष्मदर्शी धोरणे/निकषः-

समितीने असे ठरविले की, पुढीलप्रमाणे मार्गदर्शक निकषांचा पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी सर्वसाधारणपणे नविन महाविद्यालय / अभ्यासक्रम, अतिरिक्त तुकडया/विषय सुरू करण्याबाबत विचार व्हावा.

१. प्रत्येक महाविद्यालयातील एकूण तुकडयांची संख्या महानगरपालिका व नगरपालिका परिसरात ४ तर महानगरपालिका व नगरपालिका व्यतिरिक्त २ राहील. परंतु सद्यस्थितीत महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या तुकडयांची संख्या जशी आहे तशी राहिल.

२. ज्या महाविद्यालयातील मागील तीन वर्षात अस्तित्वात असलेल्या तुकडया ८० टक्याहून अधिक भरल्या असतील तरच या अधिक तुकडयांना मान्यता दिली जाईल.

३. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून नाविन्यपूर्ण शिक्षणक्रम/अभ्यासक्रम सुरु करु इच्छिणाऱ्या महाविद्यालयांना प्रोत्साहन दिले जाईल.

४. महाविद्यालयांच्या निवडीकरीता उपलब्ध सुविधा, मान्यताप्राप्त प्राचार्य, उपलब्ध शिक्षकवृंद, पेपर तपासणीच्या तसेच मुल्यांकनाच्या कामातील सहभाग, इतर पायाभूत सुविधा बरोबर निकटच्या महाविद्यालयापासून असलेले अंतर इत्यादींचा मार्गदर्शक निकषांमध्ये समावेश केला आहे.

५. तसेच ज्या महाविद्यालयांनी वाढीव तुकडया, नवे अभ्यासक्रमाकरीता अर्ज केले असतील त्यांचे शिक्षणाचा उच्च दर्जा टिकवण्यासाठी नॅक/एनबीए मुल्यांकन/पुर्नमुल्यांकन दिनांक ३१ डिसेंबर २०१५ पुर्वी झालेले असणे आवश्यक आहे, तसेच संबंधित सोसायटी, ट्रस्ट, संस्था यांची उच्च शिक्षण उपलब्ध करण्याबद्दल असलेली आस्था इत्यादी बाबी विचारात घेण्यात येतील.

६. बृहत आराखडयात नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार विद्यापीठातर्फे पुढील निकषांनुसार अर्जांची छाननी करण्यात येईल.

i. महाविद्यालयाचे तालुका निहाय भौगोलिक स्थान
ii. तालुक्यात मान्य केलेली विद्याशाखा
iii. नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम असलेल्या महाविद्यालयांना प्रोत्साहन देण्यात येईल.
iv. त्या क्षेत्रातील उपलब्ध असलेली निकटची महाविद्यालये.
v. संस्थेचा उच्च शिक्षण क्षेत्रातील अनुभव.

| शहरांचे वर्गीकरण | दोन महाविद्यालयातील अंतर |
|---|---|
| अ. महानगरे - लोकसंख्या - १५ लाखापेक्षा जास्त | ०२ कि.मी. |
| ब. महानगरपालिका-लोकसंख्या ५ लाख ते १५ लाख | ०३ कि.मी. |
| क. जिल्हयाचे ठिकाण | ०४ कि.मी. |
| ड. निम शहरी विभाग-लोकसंख्या २ लाख ते ५ लाख | ०५ कि.मी. |
| इ. ग्रामीण भाग | २० कि.मी. |
| फ. आदिवासी व डोंगराळ भाग | १० कि.मी. |

७. मा. शिक्षणमंत्री उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासन यांनी दिलेल्या आश्वासनानुसार प्रत्येक जिल्हयात एक शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची परवानगी मिळाल्यास असे महाविद्यालय सुरु करण्याची बृहत आराखडयामध्ये तरतुद करण्यात आलेली आहे.

८. महिला सक्षमीकरणाच्या उद्देशाने महिला महाविद्यालय सुरु करण्यासंदर्भात प्रस्ताव आल्यास त्या बाबत बृहत आराखडयात तरतूद करण्यात आली आहे.

९. कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम सुरु करण्याच्या उद्दिष्टाने कल्टीवेशन ऑफ बांबू ॲण्ड केन इंडस्ट्रि, ओशिनोग्राफी, मरीन बॉयोलॉजी यासारखे अभ्यासक्रम/विद्याशाखा सिंधु स्वाध्याय संस्थेतर्फे उपलब्ध करुन देण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. फायर ॲण्ड सेफ्टी मॅनेजमेंट हा अभ्यासक्रम विशेषत: नवी मुंबई, रायगड क्षेत्राच्या औद्योगिक क्षेत्रामध्ये उपलब्ध करुन देण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. हा अभ्यासक्रम वैशिष्टपूर्ण असून अभ्यासक्रमातील एक वर्ष पूर्ण करणा-या विद्यार्थ्यास पदविका प्रमाणपत्र, दोन वर्ष पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यास प्रगत पदविका प्रमाणपत्र व तीन वर्ष पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यास पदवी प्रदान करण्यात येईल. इतर कौशल्याधिष्ठीत अभ्यासक्रम औद्योगिक गरजेनुसार व भौगोलिक परीस्थितीनुसार त्या त्या क्षेत्रातील जिल्हा उद्योग केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु केले जातील.

१०. बृहत आराखडयामध्ये संगीत केंद्र व नृत्य यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्र व पदवी अभ्यासक्रम संलग्नीत महाविद्यालये / संस्था व दूर व मुक्त अध्ययन संस्थेमार्फत उपलब्ध करुन देले जातील. त्याचप्रमाणे क्रीडा व्यवस्थापनातील प्रमाणपत्र/पदवी /एम.बी.ए. अभ्यासक्रम दूर व मुक्त अध्ययन संस्था यांच्यातर्फे लवकरच सुरु केले जातील.

११. जी महाविद्यालये/संस्था यामधील पदवी अभ्यासक्रमांच्या दोन बॅचेच पूर्ण झालेल्या असतील त्याच महाविद्यालयाचे /संस्थाचे पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे प्रस्ताव विद्यापीठातर्फे स्विकारले जातील.

१२. संलग्नित स्वायत्त महाविद्यालये, श्रेष्ठत्व सक्षम महाविद्यालये आणि नॅक/नॅब द्वारा 'अ' क्षेणी मिळविलेली महाविद्यालये यांना ग्रामीण भागामध्ये आपले अभ्यासक्रम /सॅटेलाइट सेंटर सुरु करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल.

## शिफारसी

### नवीन महाविद्यालये/अभ्यासक्रम/तुकडया/विषय सुरु करण्याबाबत शिफारसी

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण परीषदेने गठित केलेल्या डॉ. नरेंद्र जाधव समितीने बृहत आराखडा तयार करण्यासंबंधित सुचविलेल्या निकषानुसार विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठीचा बृहत आराखडा तयार करण्यात आलेला आहे त्यातील महत्वाच्या शिफारशी पुढीलप्रमाणे :

अ. मागील वर्षाचे शैक्षणिक वर्ष (२०१५-१६) मधील विधी महाविद्यालयाचे प्रस्ताव तसेच पालघर जिल्हयातील प्रस्ताव, तसेच नवीन अभ्यासक्रम, वाढीव तुकडया, विषय यासाठी ज्या संस्थानी/महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये विद्यापीठाकडे प्रस्ताव पाठविले होते व विद्यापीठाने शिफारस करुन जे प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे परवानगीसाठी पाठविले होते अशा सर्व प्रस्तावाचा पुर्नविचार शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठी करण्यात येईल. परंतु सदर संस्था / महाविद्यालयानी विहित नमुन्यात ३१ डिसेंबर, २०१५ पुर्वी सर्व कागदपत्रांसहीत पुन्हा प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करणे आवश्यक राहील. तसेच सदर संस्था/महाविद्यालयाचे जे प्रस्ताव विद्यापीठाकडून महाराष्ट्र शासनाकडे पाठविले होते त्यांची फी जर संस्था/महाविद्यालयांनी विद्यापीठाकडून परत घेतली नसेल तर अशा संस्था/महाविद्यालय यांना त्यांच्या नविन पाठविलेल्या प्रस्तावाबरोबर फी पाठवण्याची आवश्यकता नाही याची नोंद घ्यावी.

ब. मुंबई विद्यापीठाच्या परीक्षेत्रातील सकल सहभाग गुणोत्तर **५%** वाढविण्यासाठी बृहत आराखडयामध्ये खालीलप्रमाणे शिफारसी करण्यात आलेल्या आहेत.

१. मुंबई विद्यापीठ परीक्षेत्रातील ठाणे ग्रामीण तसेच पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्हयामध्ये २० कि.मी. परीसरामध्ये महाविद्यालय नसेल तर अशा ठिकाणी नविन महाविद्यालय सुरु करण्याबाबत तरतुद असेल.

२. विविध क्षेत्रातील कौशल्याधिष्ठित मनुष्यबळाची गरज लक्षात घेता मुंबई, ठाणे व नवी मुंबई हया जिल्हयातील संलग्नित महाविद्यालयांकडून या बाबतचे प्रमाणपत्र, पदविका व पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

३. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून जे महाविद्यालय नाविन्यपूर्ण/पारंपारिक अभ्यासक्रमांची मागणी करतील त्यांना प्रोत्साहन देण्यात येईल. सोबत अभ्यासक्रमांची यादी जोडली आहे.

४. नविन महिला महाविद्यालये व रात्र महाविद्यालय सुरू करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

५. सद्यस्थितीतील प्रवेश क्षमता, रिक्त जागा यांचा आढावा घेवून आवश्यकतेनुसार व भौगोलिक क्षेत्राची परीस्थिती पाहून नविन अभ्यासक्रम, वाढीव तुकडया व नविन विषय यांची मान्यता देण्याची तरतुद संपूर्ण विद्यापीठ परीक्षेत्रामध्ये करण्यात आलेली आहे.

६. एनसीसी, एनएस्एस्, फीजीकल एज्युकेशन ॲण्ड एक्सटेंशन ॲक्टिव्हिटि हे ऐच्छिक विषय बी. ए., बी.कॉम., बी.एस्सी. या अभ्यासक्रमासाठी पायाभूत अभ्यासक्रमा ऐवजी मागितल्यास त्यास प्रोत्साहन देण्याची तरतूद केली आहे.

७. एन.सी.टी.इ. च्या मार्गदर्शक तत्वानुसार अस्तित्वात असलेल्या शिक्षणशास्त्र (B.Ed.) महाविद्यालयामध्ये बी.ए.-बी.एड./बी.एस्सी.-बी.एड. हा चार वर्षाचा इंटीग्रेटेड प्रोग्राम सुरु करण्याची बृहत आराखडयात तरतुद आहे.

८. संलग्नित महाविद्यालयांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी व सर्वत्र उच्च दर्जाच्या शैक्षणिक सोयी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने ज्या महाविद्यालयांनी नॅक/नॅब कडून मूल्यांकन करून घेतले आहे. त्यांचेकडून 'स्मार्ट कॉलेज' योजनेअंतर्गत प्रस्ताव मागविण्यात येतील.

९. संलग्नित विधि महाविद्यालयांमध्ये एल.एल.बी.(३ व ५ वर्ष) अभ्यासक्रमाकरिता एक तुकडी असलेल्या महाविद्यालयांचेच दुस-या अतिरिक्त तुकडीसाठी प्रस्ताव स्विकारण्यात येतील.

१०. एलएल.एम. अभ्यासक्रम संलग्नित विधी महाविद्यालयांमध्ये फक्त मुंबई, ठाणे व इतर जिल्हयाच्या ठिकाणी सुरू करण्याची तरतूद करण्यात येत आहे.

११. संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी द्वितीय पाळी (Second Shift) धरून दोन तुकडयांची मर्यादा राहील.

# मुंबई विद्यापीठ

## शैक्षणिक वर्ष २०१६-१७ या सालाकरिता बृहत आराखडयानुसार नविन महाविद्यालयांसाठी निश्चित केलेले स्थान पारंपारिक महाविद्यालये (पदविपुर्व)

| अनु. क. | विद्याशाखेचे नाव/तपशिल | मुंबई शहर<br>मुंबई उपनगर | ठाणे<br>नवी मुंबई | पालघर | रायगड | रत्नागिरी | सिंधुदूर्ग | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कला, वाणिज्य आणि विज्ञान | मुंबई शहर-१ | शहापूर तालुका-१ | प्रत्येक तालुक्यात एक-(एकूण-८) | जिल्हयात -१ | जिल्हयात -१ | जिल्हयात -१ | १३ |
| २ | विधी महाविद्यालये | मुंबई शहर-२ (एक महिलांसाठी राखीव )<br>मुंबई पूर्व उपनगर-१<br>मुंबई पश्चिम उपनगर-१ | ठाणे शहर-१<br>ठाणे ग्रामीण-१<br>नवी मुंबई-१ | जिल्हयात -१ | जिल्हयात -१ | जिल्हयात -१ | जिल्हयात -१ | ११ |
| ३ | बी.एड् (स्पेशल एज्युकेशन-लर्निंग डीसअॅबीलीटी) | जिल्हयात -१ | जिल्हयात -१ | --- | जिल्हयात -१ | --- | --- | ३ |
| ४ | रात्र महाविद्यालये (कला, वाणिज्य आणि विज्ञान) | मुंबई शहर-(फोर्ट)-१<br>मुंबई पुर्व उपनगर (कुर्ला)-१ | भिवंडी तालुका-१ | जिल्हयात -१ | पनवेल-१ | रत्नागिरी शहर -१ | जिल्हयात -१ | ७ |
| ५ | महिला महाविद्यालये (कला, वाणिज्य आणि विज्ञान) | दादर-१<br>मुंबई उपनगर-(घाटकोपर)-१ | मुरबाड/बदलापूर तालुका-१ | जिल्हयात -१ | अलिबाग/रोहा/ श्रीवर्धन तालुके वगळून इतर तालुक्यात-१ | जिल्हयात -१ | जिल्हयात -१ | ७ |
| ६ | ललीत कला (फाईन आटर्स)(नृत्य,संगीत, पेंटींग) | ललीत कला (फाईन आटर्स)(संगीत) -१ | नवी मुंबई -१<br>ठाणे शहर -१ | जिल्हयात -१ | जिल्हयात -१ | जिल्हयात -१ | ---- | ६ |
| | एकूण | ११ | ९ | १२ | ६ | ५ | ४ | ४७ |

❖ मुंबई विद्यापीठ परिक्षेत्रातील नविन महाविद्यालयांच्या स्थानासाठी बृहत आराखडयात नमूद असलेल्या दोन महाविद्यालयांतील अंतराबाबतचा निकष लागु राहिल. तसेच अंतराचा निकष एकाच विद्याशाखेच्या दोन महाविद्यालयांसाठी लागु राहील.

टिप- अस्तित्वात असलेल्या संलग्नीत महाविद्यालयांनी B.Voc./Skill Development/Community College करिता प्रस्ताव सादर केल्यास, असे प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचेकडे पाठविण्यात येतील.

# मुंबई विद्यापीठ

## शैक्षणिक वर्ष २०१६-१७ या सालाकरिता बृहत आराखडयानुसार नविन महाविद्यालयांसाठी निश्चित केलेले स्थान

### व्यावसायिक महाविद्यालये (पदविपुर्व)

| अनु. क्र. | विद्याशाखेचे नाव/तपशिल | मुंबई शहर मुंबई उपनगर | ठाणे नवी मुंबई | पालघर | रायगड | रत्नागिरी | सिंधुदूर्ग | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अभियांत्रिकी * | ---- | जिल्हयात-१ | जिल्हयात-१ | जिल्हयात-१ | जिल्हयात-१ | जिल्हयात-१ | ५ |
| २ | स्थापत्य शास्त्र (आर्कीटेक्चर) | मुंबई पूर्व उपनगर-(घाटकोपर)-१ | ठाणे शहर -१ | जिल्हयात-१ | पेण/अलिबाग तालुका -१ | रत्नागिरी शहर-१ | ओरस-१ | ६ |
| ३ | औषध निर्माण शास्त्र (फार्मसी) | ---- | ठाणे शहर -१ | वसई व पालघर तालुका वगळून इतर तालुक्यात - १ | पनवेल आणि कर्जत तालुका वगळून इतर तालुक्यात - १ | संगमेश्वर व चिपळूण तालुका वगळूनइतर तालुक्यात-१ | सावंतवाडी तालुका वगळून इतर तालुक्यात-१ | ५ |
| | एकूण | १ | ३ | ३ | ३ | ३ | ३ | १६ |

* माननिय उच्च शिक्षण मंत्री, म.रा. यांनी विधान परिषदेत तारांकित प्रश्न क्रं. १६४, १६५, १६९ व १७३ नुसार दिलेल्या आश्वासनानुसार जिल्हास्तरिय तंत्रनिकेतन महाविद्यालय उपलब्ध असतील तेथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये, शासन व ए.आय.सी.टी.ईच्या मान्यतेच्या अधिन राहून सुरू करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

❖ मुंबई विद्यापीठ परिक्षेत्रातील नविन महाविद्यालयांच्या स्थानासाठी बृहत आराखडयात नमूद असलेल्या दोन महाविद्यालयांतील अंतराबाबतचा निकष लागु राहिल. तसेच अंतराचा निकष एकाच विद्याशाखेच्या दोन महाविद्यालयांसाठी लागु राहील.

# मुंबई विद्यापीठ

## शैक्षणिक वर्ष २०१६-१७ या सालाकरिता बृहत आराखडयानुसार नविन महाविद्यालयांसाठी निश्चित केलेले स्थान

### व्यावसायिक महाविद्यालये (पदव्युत्तर)

| अनु. क्र. | विद्याशाखेचे नाव/तपशिल | मुंबई शहर मुंबई उपनगर | ठाणे नवी मुंबई | पालघर | रायगड | रत्नागिरी | सिंधुदूर्ग | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | व्यवस्थापन | १ | --- | --- | --- | १ | --- | २ |
| | एकूण | १ | --- | --- | --- | १ | --- | २ |

❖ मुंबई विद्यापीठ परिक्षेत्रातील नविन महाविद्यालयांच्या स्थानासाठी बृहत आराखडयात नमूद असलेल्या दोन महाविद्यालयांतील अंतराबाबतचा निकष लागु राहिल. तसेच अंतराचा निकष एकाच विद्याशाखेच्या दोन महाविद्यालयांसाठी लागु राहील.

# मुंबई विद्यापीठ

## शैक्षणिक वर्ष २०१६-१७ या सालाकरिता बृहत आराखडयानुसार विद्यापीठ परिक्षेत्रातील कृषी, औद्योगिक व व्यवसायिक कौशल्याधिष्ठीत प्रस्तावित विशेष अभ्यासक्रम/योजना

| अनु. क्रं. | विद्यापीठ उपकेंद्र/परिसराचे नाव | अभ्यासक्रमांचा तपशिल |
|---|---|---|
| १ | रत्नागिरी उपकेंद्र | भारतीय रेल्वे आणि मुंबई विद्यापीठ यांच्यात झालेल्या करारानुसार 'रेल इनोव्हेशन अॅन्ड टेक्नॉलॉजी सेंटर' सुरू करण्यात येणार असून पुढील पदव्युत्तर व पदविपूर्व अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे.<br>१. एम.टेक/एम.ई (रेल्वे मॅकेनिकल इंजिनिअरिंग)<br>**२. एम.टेक/एम.ई (रेल्वे सिव्हील इंजिनिअरिंग)**<br>३. एम.टेक/एम.ई (रेल्वे इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग) |
| २ | मुंबई विद्यापीठ कार्यक्षेत्र | विद्यापीठाशी संलग्नित असलेले व 'नॅक मुल्यांकन /पुर्नमुल्यांकन धारण केलेल्या महाविद्यालयांना स्मार्ट महाविद्यालये म्हणून प्रस्ताव मागविण्यात येतील. |
| ३ | दुर व मुक्त शिक्षण संस्था | मुंबई विद्यापीठ दुर व मुक्त शिक्षण संस्थेची विविध केंद्रे विद्यापीठ परिसरात सुरू करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. |
| ४ | सिंधू स्वाध्याय संस्था व ठाणे उप परिसर | (१)ओशनोग्राफी (२) फायर अॅन्ड सेफ्टी मॅनेजमेंट (३) पॉव्हरटी मॅनेजमेंट (४) एम.बी.ए(स्पोर्टस मॅनेजमेंट) (५) फुड प्रोसेसिंग टेक्नॉलॉजी (६) इकोटुरिझम (७) बायो-डायर्व्हसिटी कर्न्सवेशन आणि (८) बांबू अॅन्ड केन इंडस्ट्रि इत्यादी हे पदव्युत्तर व पदवीका स्तरावरील अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. |

# मुंबई विद्यापीठ

## शैक्षणिक वर्ष २०१६-१७ या सालाकरिता बृहत आराखडयानुसार अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात नविन अभ्यासक्रम/तुकडया/विषय सुरू करण्याबाबत निश्चित केलेले पदविपुर्व व पदव्युत्तर अभ्यासक्रम

| अनु. क. | अभ्यासक्रम/विषयाचा तपशिल |
|---|---|
| **Arts Faculty** | |
| 1 | B.A. (Human Science) |
| 2 | B.A.(Film, T.V. & New Media Production) |
| 3 | B.A. (Culinary Arts) |
| 4 | B.A.(All Subject) |
| 5 | B.M.M. |
| 6 | M.A. (All Subject) |
| 7 | M. Lib.I.Science |
| 8 | M.Phil |
| 9 | M.A. (Business Economics) |
| 10 | M.A. (T.V. & New Media Production) |
| 11 | M.A. (ntertainment Media & Advertising) |
| 12 | M.A. (Public Policy) |
| 13 | 4-year Integrated Programme leading to B.A.B.Ed/B.Sc.B.Ed. degree |
| **Commrece Faculty** | |
| 14 | B.Com.(All Subject) |
| 15 | B.Com. (A & F) |
| 16 | B.Com. (B & I) |
| 17 | B.M.S. |
| 18 | B.Com. (Financial Management) |
| 19 | B.Com. (Investment Management) |
| 20 | B.Com. (Transport Management) |
| 21 | B.Com./B.M.S. (Environmental Management and Economics) |
| 22 | M.Com (All Subject) |
| **Science Faculty** | |
| 23 | B.Sc.(Plain) |
| 24 | B.Sc. (Computer Science) |
| 25 | B.Sc. (Hospitality Studies) |
| 26 | B.Sc. (Information Technology) |
| 27 | B.Sc. (Human Sciences) |
| 28 | B.Sc. (Inter-disciplinary) |
| 29 | B.Sc. (Psychology) |
| 30 | N.C.C./N.S.S./Physical Education and Extension Activities (Optional subject for foundation course in B.A., B.Com. & B.Sc.) |
| 31 | M.Sc. (All Subject) |
| 32 | M.Sc. (Renewable Energy) |
| 33 | M.Sc (Biodiversity and Wildlife Conservation and Management) |
| 34 | M.Sc (Hotel and Hospitality Administration) |
| 35 | M.Sc (Finance) |
| 36 | Post Graduate Diploma in Hospital & Healthcare Management |
| 37 | Post Graduate Diploma in Food Science & Technology |

| | |
|---|---|
| 38 | Post Graduate Diploma Course in Child Rights and Child Protection |
| **Engineering** | |
| 39 | B.E. (Mechatronics Engineering) |
| 40 | B.E. (Electronics and Electrical Engineering) |
| 41 | M.E. (All Subject) |
| 42 | M.E.(Mechanical Engineering – Product Design & Development) |
| 43 | M.E.(Mechanical Engineering – Energy System & Management) |
| 44 | M.E.(Electrical Engineering – Power Plant Engineering & Energy Management) |
| 45 | M.E.(Civil Engineering – Construction Engineering & Management) |
| 46 | M.E.(Signal Processing) |
| 47 | M.E.(Advance Communication & Information System) |
| 48 | M.E.(Computer Network & Information Security) |
| 49 | M.E.(Packaging Technology) |
| **Architecture** | |
| 50 | M.Arch. |
| 51 | Urban Design |
| 52 | Project Management |
| 53 | Landscape Architecture |
| 54 | Conservation |
| 55 | Environmental Architecture |
| **Pharmacy** | |
| 56 | M.Pharm. (All Subject) |
| **Fine Art** | |
| 57 | M.F.A. (Dance, Music, Painting) |
| 58 | M.F. A. (Movement Science) |
| **Law Faculty** | |
| 59 | LL.M. |
| **Management Faculty** | |
| 60 | M.M.S.(Pharma and Healthcare Management) |
| 61 | M.M.S (Digital Business Management) |
| 62 | M.M.S (Rural Business Management) |

| | |
|---|---|
| 63 | B.A. Interior Design |
| 64 | Yoga |